# मध्ययुगीन भारतातील स्त्री जीवन

**मध्ययुगाचे ३ कालखंड पडतात**

**१) इ.स. ६५०-१३१० - हिंदू राजवटींचा कालखंड**

**२) इ.स. १२०६-१५२६ - दिल्ली सल्तनतचा कालखंड**

**३) इ.स. १५२६-१७०७ - मोगल राजवटीचा कालखंड**

## इ.स. ६५० - १३१० - हिंदू राजवटींचा कालखंड :

राष्ट्रकूट ते यादवकाळात स्त्रियांचा एकूण दर्जा खालावलेलाच होता. स्त्रियांचे विवाहाचे वय कमी झाले होते. स्मृतिकारांनी विवाहाचे वय २ ते १० वर्षे सांगितले. आदर्श विवाह म्हणजे मुलीच्या ८ व्या वर्षी झालेला विवाह होय असे मानले जाई. बालविवाहाचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर झाला. फक्त राजघराणी, अधिकारीवर्ग व समृद्ध वैश्य कुटुंबांतील स्त्रिया शिक्षण घेत असत. बाकी सर्व स्त्रिया अशिक्षित होत्या.

**विवाह :** विवाह ठरविताना जात, गोत्र व पत्रिका पाहणे इ. गोष्टी समाजात रूढ झाल्या होत्या. बालविवाह होत त्यामुळे पतीनिवडीचे स्वातंत्र्य स्त्रियांना नव्हते. विवाहानंतर पतीने पतीस देवाप्रमाणे मानावे व त्याच्याशी निष्ठापूर्वक राहावे हे जे पुराणातून सांगितले होते त्याचे बहुतांश स्त्रिया पालन करत होत्या. व्यभिचार हा गुन्हा होता व त्यास देहांताची शिक्षा होती. हुंडा देण्याची प्रथा समाजात रूढ झाली होती; पण त्यास बाजारू स्वरूप आले नव्हते. जन्मोजन्मी तोच पती मिळावा असा उपदेशही केला गेला होता. विवाहित स्त्रीला सासू-सासऱ्यांच्या किंवा इतर वडीलधाऱ्या मंडळीच्या मर्जीविरुद्ध वागून चालत नव्हते. एकत्र कुटुंबाची घडणच अशी होती की, सासुरवास भोगल्याशिवाय गत्यंतरच नव्हते. सासुरवासास कंटाळून स्त्रिया माहेरी निघून जात किंवा जीवनयात्राच संपवत.

**गणिका :** 'गणिका' ही संस्था या काळातही होती. गणिका संस्थेला कायदेशीर मान्यता होती. मिताक्षरा, नारद, मत्स्यपुराण, दशकुमारचरित्र, अवन्तीसुदंरीकथा

आदी ग्रंथांत गणिकांच्या कर्तव्यांबद्दल नियम दिले आहेत. यादव काळात अनेक नगरांतून गणिकांची वस्ती होती. गणिकांना ६४ कलांचे व विशेषतः शृंगारशास्त्राचे ज्ञान असावे अशी अपेक्षा होती.

दक्षिणेतील तामिळ समाजात मात्र स्त्रियांचा दर्जा उच्च होता. उच्चवर्गीय स्त्रियांना संपत्तीचा अधिकार होता तसेच प्रशासनातही त्यांचे स्थान महत्त्वाचे होते. आंतरजातीय विवाहामुळे अनुलोम व प्रतिलोम विवाह प्रचलित होते.

**स्त्रीधन :** 'स्त्रीधना'चा अर्थ स्मृतिकारांनी सांगितला होता. विज्ञानेश्वरानेही 'मिताक्षरा'तही स्त्रीधनाचा अर्थ स्पष्ट केला आहे. स्त्रीधनापैकी कोणताही हिस्सा पुरुषाच्या परस्पर विकता येत नसे. म्हणजेच स्त्रियांना आपली मालमत्ता वा दागिने पुरुषांच्या परवानगीने विकता येत नसत.

**विधवा व परित्यक्तांचे जीवन :**

विधवा स्त्रीची वडिलांच्या वा भावाच्या घरीही कुचंबणा होत असे. विधवा व परित्यक्ता स्त्रियांचे जगणे अत्यंत कठीण होते. विधवेला आप्तस्वकियांच्या घरी काम करून पोट भरावे लागे. स्मृतिकारांनी विधवा स्त्रियांची केशभूषा व अन्न यावर बंधने घातली होती. विशेषतः ब्राह्मण स्त्रिया पतीच्या मृत्यूनंतर केशवपन करीत असत. यादवांच्या काळापासूनच केशवपनाची प्रथा महाराष्ट्रात रूढ झाली. विधवा स्त्रिया आपले उर्वरित जीवन परमार्थाच्या मार्गी लावत. मनू व याज्ञवल्क्य या स्मृतिकारांनी केशवपन प्रथेबाबत मौन धारण केले आहे.

**सतीची पद्धत :** सती पद्धतीची उदाहरणे इ.स. ६५० पूर्वीही सापडतात. हर्षवर्धनची आई सती गेली होती तर राजश्री ही त्याची बहीण सती जाण्याच्या प्रयत्नात असतानाच हर्षवर्धन तेथे पोहोचला होता. सतीप्रथेमागे पावित्र्य व पातिव्रत्य या कल्पना होत्या. यादवपूर्व काळातही ही प्रथा रूढ होती. विधवा स्त्रीची सती जाण्याची इच्छा नसली तरी तिच्या जवळचे नातेवाईक तिने सती जावे म्हणून प्रयत्न करीत. वैधव्यातील दुःख व कठीण जीवन सहन करण्यापेक्षा विधवा सती जाणेच पसंत करत. पण विधवांचे सती जाणे हे काही सार्वत्रिक नव्हते. राजकुटुंबांतील स्त्रिया, क्षत्रिय कुळांतील व राजपूत स्त्रिया सती जात. 'ज्ञानेश्वरी'त सतीप्रथेचे उल्लेख आले आहेत. यादवांच्या राजांच्या मृत्यूनंतर त्यांच्या विधवा स्त्रिया सती गेल्याची उदाहरणे दिसतात. काही पुराणांनी सतीप्रथेचा गौरव करून त्याचे फायदे सांगितले होते. ब्राह्मण वर्गाचे वाढते वर्चस्व, पुनर्विवाहास प्रतिबंध, विधवांच्या संपत्तीविषयक अधिकारांवरील निर्बंध आदींमुळे सतीप्रथा रूढ होत गेली.

इ.स. च्या १३ व्या शतकानंतर मात्र नृत्य, गायन, चित्र या कला स्त्रियांना अगदी वर्ज्य मानल्या गेल्या. कुलहीन स्त्रियांचे ते काम आहे असे मत समाजात रूढ झाले.

**विजयनगर साम्राज्यातील स्त्रियांचा दर्जा :**

**१) स्त्रियांचा दर्जा :** राजकुळांतील स्त्रियांचा दर्जा उच्च होता; पण सर्वसामान्यपणे स्त्रियांचा दर्जा कनिष्ठच होता. बालविवाहाची पद्धत रूढ होती. स्त्रियांना पती निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. उच्च कुळांतील स्त्रियांना संगीत व नृत्य शिकण्यास परवानगी होती. राजप्रासादांत राहणाऱ्या स्त्रिया ज्योतिषशास्त्र, संगीत, नृत्य याच्या जाणकार होत्या. तसेच काही स्त्रिया अंगरक्षक म्हणूनही काम करत.

**२) देवदासी प्रथा :** विजयनगर साम्राज्यात देवदासी प्रथा रूढ होती. मंदिरांत राहून स्त्रिया नृत्य करत, पूजा करत. मंदिरांना जमिनीचे दान राजे, सरदार व धनिक लोक देत असत. त्यातून देवदासींचा व मंदिरांचा खर्च चाले.

**३) गणिका :** विजयनगरच्या सामाजिक जीवनात गणिकांचे स्थान मोठे आहे. काही गणिका मंदिरांशी संबंधित होत्या तर काही स्वतंत्रपणे जीवन जगत. गणिका शिकलेल्या असत व विविध कलांमध्ये पारंगत असत. सार्वजनिक उत्सवांत गणिका भाग घेत. बहुपत्नीत्व प्रथा श्रीमंत वर्गात रूढ होती. कृष्णदेवरायास १२ लग्नाच्या बायका होत्या. त्यापैकी ३ मुख्य होत्या.

**४) सतीप्रथा :** विदेशी प्रवाशांची प्रवासवर्णने व विजयनगर साम्राज्याचे शिलालेख यातून सतीप्रथेची माहिती मिळते. सती जाणे मुक्तीचे प्रतीक मानले जाई. सतीप्रथा ही सरदार व राजपरिवारांपुरतीच सीमित होती. बार्बोसा म्हणतो, लिंगायत, चेट्टी व ब्राह्मण वर्गात सतीप्रथा रूढ नव्हती. सती गेल्याच्या ठिकाणी स्मृतिस्तंभ उभा केला जाई.

**५) स्त्री दास-** विदेशी प्रवासी व तत्कालीन शिलालेखांत स्त्री दासांचा उल्लेख आहे.

काकतीय वंशातील रुद्रांबा ही स्त्री सत्तेवर होती. इ.स. १२९३ मध्ये मार्कोपोलो हा प्रवासी मोटुपल्ली बंदरात उतरला होता. त्याने तिच्या शासन व्यवस्थेची प्रशंसा केली आहे.

कृष्णदेवराय या विजयनगरच्या सम्राटाने अनेक स्त्रियांशी विवाह केल्याचे दिसते. तिरूमल देवी व चिन्नादेवी जगन्मोहिनी या त्याच्या पट्टराण्या होत्या. त्याशिवाय नागलादेवी या नर्तिकेशी त्याने विवाह केला होता.

विजयनगरात आलेल्या अनेक विदेशी प्रवाशांनी गणिका प्रत्यक्ष पाहिल्या होत्या. गणिका वर्गातील काही स्त्रिया कर्नाटकात देवदासी समजल्या जात होत्या. मंदिरांतून आरत्या वगैरे स्वरूपात गाणे, देवःसमोर नाचणे त्या नृत्यप्रकारांतून पूजा करणे हे धर्मकर्तव्य आहे असे त्या समजत. शहरातील बड्याबड्या मंडळींशी गणिकांचे संबंध येत असत. गणिका या एका अर्थाने शरीरविक्रय करणाऱ्या सुसंस्कृत वेश्याच होत्या. खुद्द कृष्णदेवरायचे नागलदेवी या नर्तकीशी प्रेमसंबंध होते. पुढे तर त्याने तिच्याशी लग्न करून तिला राणी बनवले होते.

विजयनगर राज्यात स्त्रिया पती निधनानंतर आत्मदहन करून घेत हे तत्कालीन साहित्य, कोरीव लेख व बार्बोसा नुंनिज व सिझर फ्रेड्रिक या परकीय प्रवाशांच्या प्रवासवर्णनांतून स्पष्ट होते. आदिलशहाविरुद्धच्या युद्धमोहिमेवर जाताना आपला अंत झाला तर आपल्या राण्यांनी सती जावे असा निरोप त्याने ठेवला होता असा उल्लेख सापडतो.

## दिल्ली सल्तनतकालीन स्त्रियांचा दर्जा - १२०६-१५२६ :

मुस्लिम कालखंडातील स्त्रियांचा दर्जा हा घसरलेलाच होता. मध्ययुगात भारतात पुरुषापेक्षा स्त्रीचे स्थान गौण होते, दुय्यम होते.

१) एकपत्नी पद्धत हिंदू वा मुस्लिम समाजात ८० टक्के लोकांत रूढ होती; पण राजघराण्यांत व सरदारवर्गात बहुपत्नीत्वाची पद्धत प्रचलित होती. मलबारच्या नायरांमध्ये स्त्रियांना अनेक पती करण्याची प्रथा रूढ होती.

२) मुस्लिम समाजात पडदा पद्धतीचे काटेकोरपणे पालन होई. पडदा पद्धतीमुळे मुस्लिम समाजातील स्त्रियांवर अनेक बंधने आली होती. त्यांचे जीवन गतिशून्य बनले होते. गरीब हिंदू व मुस्लिम समाजातील गरिबांत मात्र पडदा पद्धत नव्हती. कारण अर्थार्जनासाठी गरीब स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने घराबाहेर पडावे लागे.

३) विधवा मुस्लिम स्त्रीला सती जाण्याची गरजच नव्हती. कारण ती पुनर्विवाह सहजपणे करू शकत असे. राजपूत लोकांत सामूहिक जोहर (सती) पद्धत प्रचलित होती. आपले पती युद्धभूमीवर मृत्यू पावले अशी वार्ता येताच राजपूत स्त्रीचा जोहार करत.

४) जनानखाने - मध्ययुगातील मुस्लिम राज्यकर्त्यांचे जनानखाने असत. या जनानखान्यांत सर्व धर्मांच्या व विविध जातींतील सुंदर स्त्रिया असत. ज्या दासी सुंदर असत त्या दरबारावर आपला प्रभाव टाकत. तुर्की आक्रमक भारतात येताना आपल्यासोबत स्त्रियांना आणत नसत. भारतातील स्त्रियांशी ते सक्तीने विवाह करत. या प्रसंगांना सामोरे जावे लागू नये म्हणून हिंदूंनी बालविवाहाची प्रथा सुरू केली.

५) मुस्लिम कालखंडात बालविवाहाची प्रथा होती. मुलींना आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. वधूपित्याला वरपित्याला हुंडा द्यावा लागे. हिंदू परंपरेनुसार विवाहांचे जे ८ प्रकार होते ते सर्व प्रकार या कालखंडातही अस्तित्वात होते.

६) कित्येक कुटुंबांमध्ये मुलीचा जन्म हा दुर्दैवी समजला जाई. मुलाच्या जन्माचे स्वागत होई. मात्र मुलीच्या जन्माचे स्वागत होत नसे.

७) मुस्लिम स्त्रियांत शिक्षणाचे प्रमाण कमी होते. काही मुस्लिम स्त्रिया कुराण

वाचण्यापुरते व लिहिण्यापुरते शिकत असत. श्रीमंत मुस्लिम लोक आपल्या मुलींना घरीच शिकवत. त्यासाठी विशेष शिक्षक नियुक्त केले जात. संगीत, शिवणकाम, विणकाम व पाककला यांचे शिक्षण स्त्रियांना दिले जात असे. संगीत, नृत्य, गायन या कला राजस्त्रियांना शिकण्यासाठी कृष्णदेवरायाने कलाकार नेमले होते. राण्यांना व राजकन्यांना मंदिरांत, सार्वजनिक उत्सवांच्या ठिकाणी नाचगाण्यास परवानगी नव्हती. कृष्णदेवरायच्या कारकीर्दीच्या काळातील साहित्यांतून व शिलालेखांमधून त्याकाळातील नाट्यकलेची माहिती मिळते.

८) **केशवपन -** इ.स. १२०६ ते १५२६ या कालखंडात हिंदूंतील ब्राह्मण जातीतील विधवा केशवपन करत असत. विधवांना संसाराचे आकर्षण वाटू नये, त्या स्वैराचारी बनू नयेत, तसेच व्यभिचारास बळी पडू नयेत हा या प्रथेचा हेतू होता. मुस्लिम समाजात ही प्रथा नव्हती.

**राजनीती व स्त्रिया :**

राजनीतीत सहभाग घेणारी सल्तनत काळातील पहिली स्त्री म्हणजे अल्तमशची पत्नी शाह तुर्कान ही होय. अल्तमशची पत्नी शाह तुर्कान ही उदारता, दानशूरपणा, परोपराकर व विद्वानांना संरक्षण आदींसाठी विख्यात होती. अल्तमशच्या मृत्यूनंतर सर्व दृष्टींनी अयोग्य अशा आपल्या पुत्रास गादीवर बसवून स्वत:च्या हाती सत्ता घेतली. अल्तमशची मुलगी सुलतान रझिया बेगम हिला राजनीतीचे शिक्षण मिळाले होते. रझिया चार वर्षे (इ.स. १२३६-४०) सत्तेवर होती. तिने आपल्या योग्यतेवरच हे पद मिळवले व अल्पकाळ का असेना उत्तम पद्धतीने कारभार पाहिला. जलालुद्दीन खिलजीची पत्नी मालिका ए-जहान ही राजकीय महत्त्वाकांक्षा बाळगून होती व तिने काही काळ राजकीय सत्ता आपल्या हाती ठेवली होती. जौनपूरचा सुलतान महमूद शर्कीची पत्नी ही महत्त्वाकांक्षी होती व तिनेच बहलोल लोदीशी युद्ध करण्याचा यशस्वी आग्रह आपल्या पतीकडे धरला होता. लोदी वंशातील स्त्रियाही राजनीतीमध्ये विशेष रस घेताना दिसत. अल्लाउद्दीन खिलजीने गुजरातचा राजा कर्ण याची बायको कमलादेवीशी विवाह केला. तसेच रामचंद्र देवच्या मुलीशीही त्याने लग्न केले. एक मुस्लिमाने हिंदू स्त्रियांशी विवाह केलेली ही पहिलीच उदाहरणे होत. अल्लाउद्दीनने आपला मुलगा खिज्राखानचा विवाह राजा कर्णची मुलगी देवलदेवीशी केला होता.

मोहम्मद तुघलकाची आईही या गुणांमुळे प्रसिद्ध पावली होती. गियासुद्दीन तुघलकच्या काळात दोन गायिका फतूह व मसुरत खातून प्रसिद्ध होत्या.

**रझिया सुलताना (इ.स. १२३६-१२४०)**

**१) रझिया सुलतानाच्या सत्ताप्राप्तीची पार्श्वभूमी :** अल्तमशचा ज्येष्ठ पुत्र नासुरुद्दीन हा बंगालचा सुभेदार असतानाच इ.स. १२२९ मध्ये मृत्यू पावला होता.

अल्तमशचे इतर पुत्र विलासी, नालायक व आळशी होते याची कल्पना अल्तमशला होती. मृत्यूपूर्वीच अल्तमशने आपल्या सरदारांना एकत्र बोलावून सांगितले होते, "माझी तरुण मुले तारुण्यातील सुखात रंगून गेली आहेत. त्यांच्यापैकी एकाच्याही ठिकाणी राज्यकर्त्याचे गुण नाहीत. या प्रदेशावर राज्य करण्याला ते नालायक आहेत. माझ्या मृत्यूनंतर तुम्हास असे आढळेल की, माझ्या मुलीखेरीज राज्याला योग्य मार्गदर्शक दुसरा कोणीही नाही. रझिया हीच राज्यकारभार चालवण्यास योग्य आहे." अल्तमशची ही भविष्यवाणी पुढे खरी ठरली. अल्तमशने स्वत:ची कन्या रझिया हिला आपला वारसाहक्क दिला होता. पण एका स्त्रीने दिल्लीच्या गादीवर बसावे ही गोष्ट मुस्लिम सरदारांना योग्य वाटली नाही. ही गोष्ट इस्लाम धर्माशी सुसंगत नाही असे त्यांना वाटे म्हणून अल्तमशचा दुसरा पुत्र रूक्नुद्दीन फिरोजशहा यास गादीवर बसवले. पण तोही आळशी, चैनी व विलासी होता. त्यामुळे राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी रुक्नुद्दीनची आई पाहत होती. अल्तमशच्या मृत्यूनंतर तिने आपल्या मुलाचा राज्याभिषेक करविला. रुक्नुद्दीन हा मात्र राज्यकारभाराकडे मुळीच लक्ष देत नव्हता. दारू पिऊन व हत्तीवर बसून तो संपत्तीची दिल्ली बाजारात जाऊन उधळपट्टी करत होता. त्याची आई (शहातुर्कन) व तो मिळून कटकारस्थाने करत. सावत्र पुत्र व रझिया यांच्या खुनाचे प्रयत्न त्या दोघांनी मिळून केले होते. शहातुर्कनने अल्तमशच्या कित्येक बायकांना ठार केले. त्या दोघांच्या कारस्थानांमुळे सरदारवर्ग चिडला. अनेक प्रांत स्वतंत्र झाले. अनेक सुभेदार (बदायुनी लाहोर, हंसी) दिल्लीवरच चाल करू लागले. या सर्व परिस्थितीचा विचार करून रझियाने लोकमत हे रुक्नुद्दीन फिरोजशहाच्या विरोधात कसे जाईल यासाठी प्रयत्न केले. मलिक व अमिरांमध्ये विद्रोहाची भावना निर्माण केली. शेवटी एका कटानुसार रुक्नुद्दीन फिरोजशहा व त्याची आई शहातुर्कान या दोघांना अटक करून ठार केले गेले. या कारस्थानात रझिया व तिच्या समर्थकांचा हात होता. रझियाने जनता व सैन्य यांचा पाठिंबा मिळवला होता. रुक्नुद्दीन व त्याची आई शहातुर्कान या दोघांनी फक्त ७ महिनेच दिल्लीचा कारभार पाहिला.

**२) रझिया सुलतानाचे विरोधक व समर्थक सरदार :** राज्यारोहणानंतर रझिया सुलतानाने अत्यंत हुशारीने व मुत्सद्देगिरीने कारभार सांभाळला. पंजाब, बंगाल व बिहारच्या प्रांतीय सुभेदारांनी तिची सत्ता मान्य केली; पण बदायून, मुलतान, हंसी व लाहोर येथील सरदार मात्र तिला विरोध करत होते. रुक्नुद्दीन फिरोजचा वजीर निजामुल मुल्ल-जुनैदी हाही रझियाचा एक विरोधक होता. रझियाने आपले जे विरोधक होते त्यांच्यात पद्धतशीरपणे फूट पाडली. जे विरोधक तुर्की सरदार होते त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करण्यात तिने प्रारंभी यश संपादन केले. मोहम्मद सालादी व कबीरखाँ या दोन बंडखोर सरदारांना रझियाने आपल्या बाजूस वळविले होते.

954.025
GAT

**३) अमीर जमालुद्दीन याकृतवर प्रेम व मर्जी :** हा मूळचा राहणारा ॲबेसिनियाचा होता. रझियाने साम्राज्यातील सर्व महत्त्वाच्या पदांवर आपली माणसे बसविली होती. अश्वशाळेचा प्रमुख अधिकारी जमालुद्दीन याकूतवर तिचे प्रेम होते. तो हीन कुळातील होता; पण ती त्याच्याच तंत्राने कारभार पाहत असे. तुर्की अमिरांना ही गोष्ट आवडली नाही त्यामुळे राज्यात तिच्याविरुद्ध कारस्थान करण्यास सुरुवात झाली. ताबर हिंदूंचा सुभेदार अल्तुनिया याच्या बंडाचा बीमोड करण्यासाठी ती मोठी फौज घेऊन गेली तेव्हा अमीर जमालुद्दीनला ठार मारले. तिला कैदत टाकले गेले.

**४) बंडखोर इख्तियारउद्दीन अल्तूनियाशी विवाह :** आपल्या साम्राज्यातील विविध सरदारांनी केलेली बंडे मोडून काढण्यात रझिया गुंतली होती. भटिंडाचा (तावर हिंदचा) राज्यपाल इख्तियारउद्दीन अल्तुनिया याने बंड करून रझियाला पराभूत केले व कैदेत टाकले. रझियाला पदावरून काढून आपल्या मताप्रमाणे वागणारी व्यक्ती सुलतानपदी बसवावी असा एक कट तिच्याविरुद्ध अमीर व प्रतीक सुभेदारांनी रचला होता. भटिंडाचा राज्यपाल अल्तुनिया व लाहोरचा सुभेदार कबीरखान हे दोघे या कटाचे सूत्रधार होते. इ.स. १२३९ मध्ये लाहोरचा सुभेदार मलिक कबीरखान याने तिच्याविरुद्ध बंड केले. त्याचा बीमोड करण्यासाठी ती लष्करासह लाहोरला गेली. कबीरखानचे बंड मोडले. त्याच्याशी समेट केला व त्याला मुलतानची सुभेदारी दिली.

**५) रूढीप्रिय मुस्लिमांची नाराजी :** रझियाने स्त्रियांनी वापरावयाचा पोशाख व बुरखा टाकून कोट व टोपी वापरावयास सुरुवात केली होती. ती पुरुष मंडळीत वावरत असे. ती घोड्यावरून व हत्तीवरून फिरत असे. हा सर्व प्रकार इस्लामी परंपरेच्या संकेतात न बसणारा होता. त्यामुळे रूढीप्रिय मुसलमान तिच्यावर नाराज झाले होते.

**मुझ्झुद्दीन बेहरामच सत्तास्थानी :** हा अल्तमशचा दुसरा मुलगा होता. रझियाऐवजी त्याला तख्तावर बसवले. हा मुझ्झुद्दीन बेहराम इ.स. १२४०-४२ या काळात तो सत्तेवर होता. रझिया ही अल्तूनियाच्या ताब्यात होती. रझियाने अल्तूनियाशीच विवाह केला. तिने व अल्तूनियाने मोठ्या फौजेसह दिल्लीवर आक्रमण केले व ती हस्तगत करण्याचा प्रयत्न केला; पण त्या दोघांचाही पराभव झाला. ते भटिंडाकडे पळाले; पण दरोडेखोरांनी त्यांच्यावर हल्ला करून त्यांना ठार केले (ऑक्टोबर १२४०).

**रझिया सुलतानचे मूल्यमापन :** एक सार्वभौम शासक म्हणून राज्य करणारी रझिया ही पहिली व शेवटचीच स्त्री होय. ती महत्त्वाकांक्षी, राजकारणपटू होती. ती ज्या काळात सत्तेवर आली तो काळ राजकीय अस्थैर्य, गोंधळ, राजकीय बंडखोरीचा होता. तिचा सर्व वेळ दरबारातील बंडखोरांचा बीमोड करण्यातच गेला. त्यामुळे प्रशासन व न्यायव्यवस्थेकडे लक्ष द्यावयास तिला वेळ मिळाला नाही. मुस्लिमेतरावर असलेला जिझिया कर रद्द करावा अशीही तिने सूचना मांडली होती; पण आमीर मंडळींनी ते फेटाळून लावली.



VIVEKANAND COLLEGE LIBRARY
GRATIS
Acc. No. 6052
Date 22 OCT 2013

शौर्य, धैर्य, राजनीती, कौशल्य, सेनानायकत्व इ. गुण रझियाच्या अंगी होते म्हणून काही काळ का होईना ती दिल्लीच्या तख्तावर बसून राज्य करू शकली. फेरिस्ता लिहितो, "She had a man's head and heart and better than twenty such sons." तबाकत - इ. नासिरीचा कर्ता मिनाजुस सिराज हा शमसुद्दीनच्या तसेच रझियाच्याही हाताखाली होता. या दोन राज्यकर्त्याविषयी त्याचे लिखाण बहुतेक इतिहासकारांनी विश्वसनीय मानले आहे. रझियासंबंधी **मिनजुस सिराज लिहितो,** ''सुलताना रझिया ही एक थोर राज्यकर्ती होती. ती शहाणी, समतोल व उदारवृत्तीची होती. राज्याचे हित पाहणारी न्यायी, प्रजेचे नीट पालन व सेनेचे कुशल नेतृत्व करणारी होती. तिच्या अंगी राजाला शोभणारे सर्व गुण वसत होते.'' परंतु स्त्री जातीत जन्मास आल्याने पुरुषाच्या हिशेबाने या सर्व सद्गुणांची माती झाली. आपला पिता सय्यद शमसुद्दीन याच्या कारकीर्दीत रझियाने मोठ्या रुबाबात काही अधिकार सांभाळला होता. **गो. स. सरदेसाईंच्या मते,** ''वास्तविक राज्य चालविण्यास रझिया समर्थ होती; परंतु एका स्त्रीने राज्य करावे ही कल्पनाच तुर्क लोकांना खपली नाही. याच कारणाने तिचे पतन झाले.'' **डॉ. ए. एल. श्रीवास्तवांच्या मते,** ''केवळ सामर्थ्य व शील यांच्या बळावर दिल्लीच्या सुलतानशाहीचे राजकारण राबविणारी सुलताना रझिया ही पहिली व शेवटची अल्तमशवंशीय शासिका होय.''

रझियाने ३ वर्षे ६ महिने व ६ दिवस राज्य केले. रझियाचा आत्मविश्वास मोठा होता. सत्ता हाती घेताना तिने जाहीरपणे आव्हान केले की, ''कुणाही पुरुषापेक्षा मी अधिक कार्यक्षम व कुशल शासन करणारे ठरले नाही तर तुम्ही मला खुशाल सत्तेवरून खाली खेचू शकता.'' अमीर लोकांनी तिच्याविरुद्ध सतत आव्हाने (संकटे) निर्माण केली नसती व तिला आणखी काही आयुष्य लाभले असते तर भारतीय इतिहासात तिचे मोठे नाव झाले असते.

## मोगलकालीन स्त्रियांचा दर्जा (इ.स. १५२६-१७०७)

मोगल कालखंडात स्त्रियांचा दर्जा सर्वसाधारणपणे दुय्यम व गौणच होता. स्त्रियांना कुटुंबात, समाजजीवनात व राजकारणात फारसे महत्त्व नव्हते. १० टक्के स्त्रियांचा अपवाद वगळला तर स्त्रिया अत्यंत वाईट पद्धतीचे यातनामय जीवन जगत होत्या असे म्हणावे लागेल. स्त्री ही उपभोगाची वस्तू आहे असाच एकूण दृष्टिकोन होता. स्त्रियांना कोणतेही स्वातंत्र्य नव्हते. अज्ञानीपणामुळे स्त्रियांना कोणत्याही अधिकारांची यांना जाणीव झालेली नव्हती.

**१) एकत्र कुटुंबात स्त्रीचे स्थान गौण -** मोगल कालखंडात पूर्वपरपरेनुसार हिंदू समाजात एकत्र कुटुंब पद्धती होती. सासू, सासरे, दीर, जावा, नणंद व इतर आप्त या सर्वांची सेवा करीत स्त्रीला कुटुंबात राहावे लागे. ८०% पेक्षा अधिक स्त्रियांना घरकाम करावेच लागे. ८०% स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे चूल व मूलच होते. अगदी घरातदेखील

(आईवडिलांच्या) तिचा पती तिच्याशी बोलत नसे. शेती, कारागिरी जो काही कुटुंबाचा व्यवसाय असेल त्यात तिला मदत करावी लागे. सामान्यपणे ५०% स्त्रियांना घरकामांबरोबरच शेती व्यवसायातही श्रम करावे लागत. मुलीचा जन्म कुटुंबात अशुभ मानला जाई.

**२) विवाहसंस्था व विवाहाचे प्रकार :-** भारतीय परंपरेत विवाहांचे ८ प्रकार असले तरी ते सर्व रूढ नव्हते. बालविवाहाची प्रथा संपूर्ण भारतात रूढ होती. ८-१० वर्षांच्या आतच मुलीचे विवाह होत असत. पिशाच्च विवाह (फसवून किंवा शील भ्रष्ट करून केलेला विवाह) होत असत. पण हे प्रकार आपवादानेच घडत. वर्णसंस्कार टाळण्याचा, जातीची पवित्रता राखण्याचा प्रयत्न सर्वच जातीतील लोक करत.

छत्रपतीच्या घराण्यात व पेशव्यांच्या घराण्यात सरदार, सेनापती, मुत्सद्दी यांच्यात बालविवाह करण्याची प्रथा होती. पुरुषांचेही बालविवाह होत असत. पती हाच परमेश्वर असे समजण्याची धारणा समाजात प्रचलित होती. मुस्लिमांत तलाक पद्धत होती. हिंदू मात्र तुलनेने घटस्फोटांचे प्रमाण कमी होते. शूद्र जातीत पाट लावणे, मोहतूर लावणे इ. प्रकार होते.

**३) सक्तीचे वैधव्य :-** हिंदू स्त्रियांवर वैधव्याची सक्ती होती. त्यांना पुन्हा विवाह करता येत नसे. मनुस्मृतीत विधवांचा आचारधर्म (पांढरी वस्त्रे घालणे, अलंकार न घालणे, धार्मिक विधी व महोत्सवांत सहभागी न होणे, केशवपन करणे, व्रतस्थ जीवन जगणे, निकृष्ट अन्न खाणे, करमणूक कार्यक्रमांत सहभागी न होणे वगैरे) सांगितला होता. त्याचे पालन विधवा स्त्रिया करत. कनिष्ठ जातीत मात्र वैधव्याची सक्ती नव्हती. एकंदरीत विधवांना उपेक्षा, अनादर व अपमानाचे जीवन जगावे लागे. विधवेने स्वत:च्या उद्धारासाठी नव्हे तर स्वर्गात असलेल्या पतीसाठी ही बंधने पाळावीत असे धर्माचे सांगणे होते. कष्टकरी वर्गातील विधवा स्त्रिया मात्र पुनर्विवाह करत असत. मुस्लिमांत मात्र सक्तीचे वैधव्य नव्हते. ज्येष्ठ भावाच्या विधवा या धाकट्या दिराच्या मालकीच्या होत; पण हा नियम नव्हता. दाराच्या मृत्यूनंतर त्याच्या विधवा जॉर्जियन बायकोस औरंगजेबने बायको म्हणून स्वीकारले; पण रानादिल या दाराच्या दुसऱ्या विधवेने मात्र औरंगजेबाजची बायको होण्यास नकार दिला. स्वत:चे केस काढून स्वत:ला विद्रूप केले होते.

**४) बहुपत्नीत्वाची पद्धत :-** बहुपत्नीत्वाची प्रथा प्रतिष्ठित मानली जाई. बहुपत्नीत्वाच्या प्रथेमागे ख्यातनाम घराण्याशी विवाहसंबंध असावेत अशी भावना असे. अशा विवाहामागे राजकीय हेतूही असत. उदा. शिवाजी महाराजांना ८ बायका होत्या तर छत्रपती शाहूला ४, नाना फडणीसला ९, दुसऱ्या बाजीराव पेशव्याला ११, महादजी शिंदे यांना ९ बायका होत्या. मुस्लिमांना तर त्यांच्या धर्मानुसार ४ बायका करण्यास परवानगी होती. प्रत्यक्ष व्यवहारात ४ बायका करणारे संख्येने कमी असत. पण सम्राट,

सरदार, श्रीमंत, व्यापारी लोक एकापेक्षा अधिक स्त्रियांशी लग्न करत. पण सर्वसामान्यपणे समाजात एकपत्नीत्वच रूढ होते.

**५) गणिकांचा वर्ग, जोगतिणी, कुणबिणी :** भारताच्या सर्वच भागांत गणिकांचा वर्ग होताच. राज्यकर्ते, मंत्री, सरदार यांच्याकडे गणिका असत. त्या नृत्य व गायनांत निपुण असत. कुणबिणी (बटकी, वेश्या) हा एक स्त्रियांचा वर्ग समाजात अस्तित्वात होता. सैन्यातील अधिकारी, सरंजामदार किंवा सुखवस्तू लोक आपल्या पदरी अशा कुणबिणी बाळगत, कुणबिनी १०० रुपयांत विकत मिळत. त्या घराकमांसाठीही वापरता येत असत. शेतीतही काम करत व मालकांशी त्या शारीरिक संबंधही ठेवत.

**६) सती प्रथा :** महाराष्ट्रात ही प्रथा सार्वत्रिक नव्हती; पण सती प्रथेचे उल्लेख सापडतात. सती प्रथा ही प्रामुख्याने क्षत्रियांत प्रचलित होती. सती जाणारी स्त्री दोन्हीकडच्या कुळाचा उद्धार करते अशी एक कल्पना होती. सती प्रथा बंगालमध्ये कुलीन समजणाऱ्या ब्राह्मण कुटुंबांत प्रचलित होती. बंगाल वगळता भारतात ही प्रथा अत्यंत तुरळक / अपवादात्मक परिस्थितीमध्येच रूढ होती.

मोगलांच्या काळातही सती प्रथा रूढ होतीच. फ्रेंच प्रवासी बर्नियर याने 'सती' या विषयावर बरेच लिहून ठेवले आहे अनेक स्त्रिया सती जाताना त्याने पाहिल्या होत्या. मोगल सम्राट अकबर, जहांगीर यांनी सतीप्रथा बंद व्हावी म्हणून खूप प्रयत्न केले. प्रांतीय सुभेदाराच्या परवानगीशिवाय सती जाण्यास मोगल काळात मनाई होती.

राजपूत समाजात तर पती युद्धभूमीवर मृत्यू पावल्याची वार्ता येताच सामूहिक जोहार (एकाच वेळी अग्नीत उडी घेऊन जीवन संपवणे) करण्याची प्रथा होती.

**७) स्त्री शिक्षण :** स्त्रियांनी शिकू नये अशीच लोकसमजूत या काळातही रूढ होती. पेशवे, शिंदे, होळकर, दाभाडे, पटवर्धन, गायकवाड यांच्या घराण्यांतील स्त्रियांना परंपरागत पद्धतीचे शिक्षण मिळे; पण ते फक्त लिहिता व वाचता येण्यापुरते सीमित होते. एखादा शिक्षक नेमून शिक्षण दिले जाई. काही स्त्रियांना युद्धकला व प्रशासनाचेही शिक्षण मिळे. बालविवाहाच्या प्रथेमुळे मुलींचे शिक्षण फारसे होत नसे.

मोगल काळात स्त्री शिक्षणाचे प्रमाण फारच कमी होते. फक्त श्रीमंत सरदार व राजघराण्यांतील स्त्रियांची शिक्षणाची व्यवस्था घरीच राजमहालात होई. मोगल दरबारातील नूरजहान, मुमताजमहल, चांदबीबी, झेबुनिस्सा, जहानआरा, रोशनआरा वगैरे स्त्रिया सुशिक्षित होत्या. राजकारणात व प्रशासनात त्यांचा सहभाग होता. उच्चकुलीन स्त्रियांना काव्य, साहित्य, धर्मग्रंथ, व्याकरण, नृत्य, संगीत, गायन व सौंदर्यशास्त्र आदींचे शिक्षण दिले जाई.

गुलबदन बेगमने 'हुमायूननामा' या ग्रंथात आपला भाऊ हुमायूनच्या आठवणी लिहिल्या आहेत. राजपूत राजे व सरदारांच्या मुलींनाही लिहिता, वाचता येत असे. गरीब

हिंदू व मुस्लिम समाजातील मुली शिकत नसत. स्त्री शिक्षणाचे प्रमाण ५% ही नसावे. स्त्रियांचे उच्चशिक्षण हा प्रकारच रूढ नव्हता.

**८) स्त्रियांचे राजकारणातील स्थान :** मोगल कालखंडातील राणी कर्णावती (चित्तोड), राणी दुर्गावती (गोंडवना), चांदबीबी (अहमदनगर) या स्त्रियांच्या पराक्रमाच्या कथा आजपर्यंत लोकांच्या मनात घर करून बसल्या आहेत. आपल्या पुत्रास गादी मिळावी म्हणून फारुखसियरच्या आईने कटकारस्थाने केली होती. अलीवर्दीखानाच्या पत्नीने दरबारात व युद्धभूमीवर त्यास सहकार्य केले होते. सत्तासूत्रे हाती ठेवली होती. जहांगीरची पत्नी नूरजहान हिचा जहांगीरवर तर प्रभाव होताच; पण राजनीतीवरही तिचे वर्चस्व होते. नूरजहान बेगमच्या ग्रंथालयात चांगली पुस्तके होती. ती स्वत: शिकार करत असे. हत्ती, घोडे यावर सवार होऊन फिरत असे. जहांगीरने आपल्या पत्नीस प्रारंभी 'नूरमहल' व नंतर 'नूरजहान' हा किताब दिला होता. हुमायूनची पत्नी खानजादा बेगमने हुमायुनास राजकीय प्रश्नांत मदत केली होती.

राजघराण्यांतील स्त्रियांची प्रतिष्ठा वाढावी म्हणून त्यांना विविध सन्मानदर्शक पदव्या दिल्या जात. उदा. अकबरच्या आईला 'मारियाम मकानी', जहांगीरच्या आईला 'मारियम-उस-जमानी' व शहाजहानच्या आईला 'बिल्कीज मकानी' म्हणत.

**९) पडदा पद्धत :** ही पद्धत भारतात मुस्लिमांच्या आक्रमणांबरोबर रूढ झाली होती. सधन व राजपरिवारांतील स्त्रिया पडदा (बुरखा) वापरत. १५ व्या व १६ व्या शतकात बहुतेक सर्व उत्तर भारतात पडदा पद्धत सुरू झाली. राजस्थानातल्या सर्व राजघराण्यांनी ती स्वीकारली. पडद्यात राहणे कुलीनतेचे व गौरवाचे मानले जाऊ लागले. ज्या प्रदेशात मुस्लिम सत्ता प्रभावी नव्हती तेथे पडदा पद्धती नव्हती.

**१०) स्त्रिया व मालमत्तेचा अधिकार :** स्त्रियांना कौटुंबिक मालमत्तेत किती हिस्सा होता, तिला मालमत्तेत कोणते अधिकार होते हा प्रश्न आहे. एकूणच कागदपत्रे पाहता स्त्रियांना मालमत्तेत कोणताही अधिकार नसे. सर्व मालमत्ता पुरुषांच्याच नावाने असे. वडिलांच्या मालमत्तेत ती कोणताही अधिकार सांगू शकत नसे; पण पतीच्या मृत्यूनंतर जर मुले नसतील तर मालमत्तेत तिला अधिकार मिळे. जर पती निधनानंतर तिची मुले मोठी असतील तर मुलींच्या नावानेच मालमत्ता राही. तिच्या नावे मालमत्ता होत नसे. ती मालमत्तेची विक्री करू शकत नसे व नव्याने मालमत्तेची खरेदी स्वत:च्या नावाने करू शकत नसे. 'मिताक्षरा' या ग्रंथात विधवा पत्नीचा मालमत्तेत हक्क मान्य केला असला तरी वैधव्याच्या काळात मुलांच्या दयेवर तिला अवलंबून राहावे लागे.

शहाजहान आपली मोठी व आवडती मुलगी जहानआरा या राजकन्येला वार्षिक ३० लाख रु. देत होता. त्याशिवाय सुरत बंदराचा महसूल तिला पानविड्याच्या खर्चासाठी मिळालेला होता. त्याशिवाय तिच्या वडिलाने तिला पुष्कळ रत्ने दिली होती.

अंत:पुरातील स्त्रिया जेव्हा बाहेर पडतात तेव्हा त्या पडदा झाकलेल्या मेण्यातून प्रवास करत. अंत:पुरातील स्त्रिया उपचारासाठी जे हकीम, वैद्य असत त्यांना वार्षिक मुशाहिरा दिला जाई. अंत:पुरातील लोक अत्यंत चैनीत, थाटामाटात व आनंदात राहत असत. मोगल राजे जेव्हा युद्धमोहिमांवर जात तेव्हा त्यांच्या बायका, मुली, रखेल्याही सोबत असत.

**११) हिंदू व मुस्लिम स्त्रियांचा दर्जा :** मोगल कालखंडात एकूण मध्ययुगातच स्त्रियांना फारशी प्रतिष्ठा नव्हती. त्यांचे समाजजीवनातील स्थान दुय्यम होते. ९५ टक्के स्त्रियांचे कार्यक्षेत्र चूल, मूल व काबाडकष्टांची शेतीची कामे करणे एवढेच होते. धार्मिक अंधश्रद्धा व रूढी, परंपरा यामुळे स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील वावर फारसा नव्हता. स्त्री हे भोगविलासाचे साधन आहे अशी समाजाची धारणा होती. स्त्रियांवर अनेक प्रकारचे अत्याचार, जुलूम होत असत. हिंदू स्त्रियांपेक्षाही मुस्लिम स्त्रियांचे जीवन वाईट होते. मुसलमानांतही बालविवाहाची प्रथा होती. शिवाय मुसलमानांत सख्ख्या चुलत्याच्या कन्येशी विवाह करीत. अकबराचा वयाच्या ९ व्या वर्षी चुलता हिंदालच्या कन्येशी विवाह झाला होता. देखण्या हिंदू मुलींचे मुस्लिम शासक व अधिकारी यांच्याकडून अपहरण होण्याची भीती असे म्हणून मुलीचे विवाह बालवयातच होत होते. सर्वसामान्य मुस्लिम स्त्रियांना समाजात काही स्थान नव्हते. मुस्लिम स्त्रियांना घराबाहेर पडताना पडदा वापरावा लागे. मुसलमानांत बहुपत्नित्व होते. तसेच तलाक पद्धती होती. हिंदूंमध्ये एकपत्नित्व पाळत असत. पण सरदार, मनसबदार श्रीमंत लोकांत बहुपत्नित्व होते. रजपूत स्त्रियांत पडदा पद्धत होती. मोगल बादशहा आपल्या मुलींची लग्ने होऊ देत नसत. ही प्रथा अकबरापासून चालत आली होती. कारण मुलीच्या मुलाचा चेहरा पहिल्यास राजास मृत्यू येतो असा समज होता. कन्या जन्म अशुभ मानला जाई. अमीर खुस्रोने आपल्या मुलीच्या जन्माच्या वेळी खेद प्रकट केला होता. औरंगाबजेबच्या मुलींनी मात्र आपली लग्ने करून देण्यास औरंगजेबला भाग पाडले होते.

हिंदू समाजात बालविवाहाची पद्धत होती. विधवांना पुनर्विवाहाचा अधिकार नव्हता. रजपूत लोकांत तर कन्यावधाची प्रथा होती. हिंदू समाजात हुंडा पद्धत रूढ होती.

**१२) जनानखाने (अंत:पूर) व मीनाबाजार :** मोगल बादशहांचे जनानखाने असत. त्यास अंत:पूर म्हणत बादशहा शहाजहानच्या काळात या अंत:पुरातील स्त्रियांची संख्या २००० पर्यंत होती. या स्त्रियांचे हुद्दे त्यांनी करावयाची कामे नेमून दिलेली असत, ही कामे म्हणजे बादशहा, त्याच्या बायका, रखेल्या, मुली यांची सेवा करणे. अंत:पुरातील स्त्रियांवर देखरेख ठेवण्यासाठी व्यवस्थापक असत. या अंत:पुरामध्ये गायिका व नर्तकी असत. अशा गायिका व नर्तकी यांची नावे निकोलस मनुची याने 'असे होते मोगल' या ग्रंथात दिली आहेत. अंत:पुरातील स्त्रियांना अलंकार वापरण्याची

मोठी हौस होती. वाढदिवशी, सणवार, राजपुत्र-राजपुत्रींचा जन्म इत्यादी प्रसंगी अंत:पुरात मोठा उत्सव साजरा होई. त्या राजकन्या, राण्या, राजपुत्र यांच्यासाठी कार्यक्रम सादर करीत, शहाजहानच्या काळात तर अंत:पुराचा खर्च एक कोटीपेक्षा जास्त होता.

जहांगीरच्या जनानखान्यात ३०० स्त्रिया होत्या. त्याशिवाय जहांगीरच्या विधिवत विवाहाच्या ३० बायका होत्या. **निकोलस मनूची म्हणतो,** ''मुसलमानांना स्त्रियांबद्दल फार आसक्ती असे. स्त्रिया हीच मुख्य करमणूक आणि जवळजवळ एकमेव सुख होय. मनूची असेही लिहितो, मुस्लिम स्त्रियांच्या रक्षणाबाबत काळजी करीत. ते आपल्या बायकांना स्वत:च्या भावासमोर पण येऊ देत नसत. ''

अंत:पुरातील राण्या, राजकन्या आणि इतर स्त्रिया यांना वेगळे तनखे मुक्रर केलेले असत. औरंगजेबच्या जनानखान्यात जन्मलेल्या मुली धर्माच्या तत्त्वांचा अभ्यास करीत. कुराणाचे अध्ययन करून त्याचे भाषांतर करीत.

शहाजहानचे सर्व पुत्र संगीत, नृत्य, नर्तकी या गोष्टींचे शौकीन होते. शहाजहानचा एक पुत्र दारा हा राणादिल या सामान्य नर्तकीच्या प्रेमात पडला होता. तिच्याशी त्याने विवाहही केला होता. दाराच्या मृत्यूनंतर तिने औरंगजेबची पत्नी होण्यास स्पष्ट नकार दिला होता. शहाजहानचा दुसरा पुत्र शाह शुजालाही स्त्रिया, गायन, नर्तन याचा नाद होता.

**१३) मोगल-रजपूत विवाहसंबंध -** १५६२ मध्ये अंबरचा रजपूत राजा थारमल याने आपली मुलगी अकबरास दिली. हा विवाह समारंभ मोठ्या थाटात झाला. यापूर्वी पण मुस्लिम राजे व रजपूत कन्या यांचे विवाह झाले होते पण ते सक्तीचे व नाखुशीचे होते. अशा लग्नात प्रथम रजपूत मुस्लिमांना मुसलमान करून घेऊन मुस्लिम पद्धतीने त्यांची लग्ने होत असत. पण अम्बरच्या राजकन्येवर मुसलमान होण्याची सक्ती करण्यात आली नव्हती. अम्बरची राजकन्या हीच जहांगीरची माता होय. **डॉ. ए. एल. श्रीवास्तव यांच्या मते,** ''भारमलच्या मुलीबरोबर अकबराचा विवाह म्हणजे मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील एक अर्थपूर्ण घटना होय. हा विवाह दोन्ही बाजूनी संमतीने घडून आला आणि त्यामुळे रजपूत व मुघल यामध्ये भक्कम पायावर सलोखा निर्माण होण्यास मदत निर्माण झाली.'' अकबराने बिकानेर व जैलसमेरच्या रजपूत राजकन्येशीही विवाह केले होते. अकबराची एक बायको ख्रिश्चन होती. अकबराचा मोठा मुलगा सलीमचा विवाह जोधपूरच्या राजकन्येशी झाला होता. या विवाहसंबंधांमुळे रजपूत म्हणजेच हिंदू-मुसलमान यांच्यातील संबंध दृढ होण्यास मदत झाली. अकबराने रजपुतांना प्रशासनात मानाची व जबाबदारीची पदे दिली. शहाजहानचा जन्महीं एका राजपूत राजकन्येपोटी झाला होता. औरंगजेबाच्या काळात मात्र रजपूत-मोगल संबंध बिघडले. औरंगजेबाच्या जुलुमास कंटाळून मेवाड व मारवाडच्या राजपुतांनी हाती शस्त्र घेतले. उत्तर मोगलशाहींच्या काळातही मोगल-रजपूत यांच्या संबंधात ताणतणाव कायमच राहिले.

**सम्राट अकबराच्या स्त्री सुधारणा :**

संपूर्ण मध्ययुगात स्त्रीविषयक प्रश्नांचा अभ्यास करून प्रत्यक्षात स्त्री सुधारणा घडवून आणणारा अकबराशिवाय दुसरा सम्राट आढळत नाही. अबुल फझलने लिहिलेल्या 'आईन-ए-अकबरी' या ग्रंथात अकबराने केलेल्या स्त्रीविषयक सुधारणांचा उल्लेख आहे. तो स्वत: कट्टर मुस्लिम असूनही स्त्री सुधारणांबाबत मात्र त्याने अत्यंत पुरोगामी भूमिका घेतली याचे आश्चर्य वाटते.

१) मुलीचे वय १४ व मुलाचे १६ पूर्ण असल्याशिवाय लग्न करू नये असे फर्मान त्याने काढले.

२) पुरुषापेक्षा स्त्री १२ वर्षांनी मोठी असेल तर अशा विषम विवाहावर त्याने बंदी घातली होती.

३) एकपत्नी विवाह पद्धत मुस्लिमांत रूढ व्हावी म्हणून त्याने प्रयत्न केलेले दिसतात. त्यासाठी त्याने उलेमांशी इबादतखान्यात चर्चा केली. सामान्य स्थितीतील मुस्लिमांनी एकपत्नीत्वच स्वीकारावे याबाबत तो आग्रही होता. (स्वत: त्याने ३०० विवाह केले होते)

४) हुंडा प्रथेसही त्याचा विरोध होता.

५) वेश्या व्यवसायाचे नियंत्रण करण्यासाठी त्याने पावले उचलली. वेश्यांनी शहराच्या एका वेगळ्या विभागात वास्तव्य करून राहावे असे त्याने फर्मान काढले. वेश्यांनी व्यवसायाचा परवाना काढावा तसेच ज्याला वेश्यागमन करावयाचे त्याने दरोगा कचेरीत नोंदणी करावी असा नियम केला.

६) वयस्कर स्त्रियांनी संमेलन, प्रदर्शने इ. ठिकाणी बुरखा वापरू नये असे आवाहन त्याने केले.

७) सतीच्या चालीस त्याने प्रतिबंध केला.

८) हिंदू मुलीचा जबरदस्तीने मुसलमानाबरोबर विवाह केला तर त्या मुलीला परत सुरक्षितपणे तिच्या पित्याच्या स्वाधीन करावे.

या सुधारणांवरून त्याचा प्रागतिक दृष्टिकोन, बुद्धिवाद व उदारमतवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो.

## मोगलकालीन ऐतिहासिक स्त्रिया

**गुलबदन बेगम :** सम्राट बाबरची कन्या. ती विद्वान होती. 'हुमायूननामा' या ग्रंथाची लेखिका. सम्राट हुमायूनच्या आठवणी तिने या ग्रंथात लिहिल्या आहेत. मोगलकालीन शाही विवाह सोहळे, बाबत व हुयमायूनने चरित्र यावर या ग्रंथातून प्रकाश पडतो.

**राणी दुर्गावती :** गोंडवनचे क्षेत्रफळ ३०० मैल लांब, १६० मैल रुंद होते. त्यात ७० हजार खेडी होती. गोंड लोकांची तेथे वस्ती होती. १५६४ पर्यंत गोंडवन

स्वतंत्र राज्य होते. तेथे राणी दुर्गावती राज्य करीत असे. तिने २० हजार घोडेस्वार, हत्तीदल, पायदल असे सुसज्ज सैन्य बाळगले होते. शौर्य, धैर्य, कर्तृत्व तिच्याजवळ होते. सौंदर्य होते. अकबराचा सेनापती असफखानने तिच्याविरुद्ध युद्धमोहीम उघडली. राणी दुर्गावतीने असफखानच्या फौजेचा यशस्वी मुकाबला केला. हत्तीवर बसून ती स्वत: लढली. जखमी झाली. शत्रूची युद्धकैदी होण्यापेक्षा किंवा शत्रूला पाठ दाखवण्याऐवजी तिने स्वत:च आपल्या हाताने पोटात खंजीर खुपसून आत्महत्या केली. असफखानचा विजय झाला. गोंडवना मोगल साम्राज्यात विलीन झाले. पती निधनानंतर गोंडवनचा कारभार राणी दुर्गावतीने उत्तम पद्धतीने सांभाळला होता. गोंडवनच्या स्वातंत्र्यासाठी तिने देह ठेवला.

**चांदबीबी :** विजापूरच्या आदिलशाहीचा सुलतान इब्राहिम आदिलशहाची पत्नी व अहमदनगरच्या हुसेन निजामशहाची कन्या होती.पती वयस्कर असल्याने पतीच्या हयातीत व पतीच्या मृत्यूनंतर विजापूरचा कारभार उत्तम प्रकारे सांभाळला होता. इ.स. १५९७ मध्ये मोगल सत्तेने आक्रमण करून विजापूर व अहमदनगरच्या लष्कराची पिछेहाट केली. कोणाकडूनही मदत मिळत नाही म्हणून तिने मोगलांशी वाटाघाटी सुरू केल्या. पण हा निर्णय सरदारांना न आवडल्याने अंतर्गत कलहाला बळीपडून इ.स. १६०० मध्ये तिचा खून केला गेला. बुऱ्हाण-उल-मुलकचा नातू राजा बहादूरच्या नावाने चांदबीबी अहमदनगरचा कारभार पाहत होती. अहमदनगरच्या संरक्षणासाठी तिने शौर्याने लढा दिला.

**जोधाबाई :** आशुतोष गोवारीकर यांनी 'जोधा अकबर' हा चित्रपट काढला. त्यावर वादंग झाले होते. जयपूरचा राजा बिहारीमलची ही कन्या. तिचा सम्राट अकबराशी विवाह झाला होता. सम्राट अकबराने फत्तेपूर सिक्री येथे तिच्यासाठी स्वतंत्र महाल बांधला होता. तिच्याच पोटी सलीम (जहांगीरचा) जन्म झाला होता. राजपूत स्त्रियाचा मुस्लिम राजाबरोबर झालेला मध्ययुगीन इतिहासातील पहिला विवाह. अकबराने तिला मानाने वागवले.

**नूरजहान :**

**जहांगीरच्या कारकीर्दीतील नूरजहानचे स्थान :** जहांगीरच्या कारकीर्दीतील सर्वात महत्त्वाची घटना म्हणजे नूरजहानचा उदय व जहांगीरच्या एकूण कारकीर्दीवर तिचा पडलेला प्रभाव होय. 'तार्तीमा-इ-वाकियात-इ-जहांगिरी' या तत्कालीन ग्रंथात म्हटले आहे, " मोगल साम्राज्यातील संपूर्ण घडामोडी नूरजहानच हाताळीत होती. तिच्या नावाने खुतबा वाचणेच शिल्लक राहिले होते. एरव्ही ती अनियंत्रित सम्राटच होती."

'इक्बालनामा-ए-जहांगिरी' या ग्रंथावरून नूरजहानच्या पूर्वचरित्राची माहिती उपलब्ध होते. तिचे पूर्वज मूळ पर्शियाची राजधानी तेहरानचे रहिवासी होते. तिचे

आजोबा ख्वाजा मोहम्मद शरीफ हे कर्तबगार होते व खारोसनच्या (पर्शियन शहाच्या साम्राज्याचा एक भाग) सुलतानाकडून वजीरपद मिळवले होते. घियासबेग हा त्याचा एक पुत्र. आपल्या वडिलाच्या मृत्यूनंतर बिकट आर्थिक परिस्थितीमुळे घियासुद्दीन बेग बायको, दोन मुले घेऊन हिंदुस्थानकडे निघाले. यावेळी त्याची बायको गर्भवती होती. कंदहार मुक्कामी असताना ती बाळंत होऊन तिला मुलगी झाली. तिचे नाव मेहरुन्निसा होते. 'मेहरुन्निसा' या शब्दाचा अर्थ स्त्रियांमध्ये सूर्य असा होतो. आपल्या नावाप्रमाणेच तिने कार्य करून दाखविले हे विशेष होय. घियास बेग लाहोरला पोहोचला तेव्हा त्याच्या सुदैवाने अकबराचा तेथे मुक्काम होता. त्याने अकबराची भेट घेतली व अकबराच्या पदरी नोकरी मिळवली. अशा प्रकारे घियास बेग हा हिंदुस्थानात आला व स्थायिक झाला.

अकबराच्या पदरी असताना स्वामीनिष्ठा व हुशारी यामुळे घियास बेगची उत्तरोत्तर प्रगती होत गेली. तो अकबराचा खासगी दिवाण बनला. तो अतिशय हुशार होता. अकबराची त्याच्यावर मर्जी बसली होती. अकबराने त्याला ३०० स्वारांची मनसब दिली होती. अकबराच्या दरबारी घियासुद्दीन बेगचे महत्त्व जसे वाढत होते तसेच इकडे त्याची कन्या मेहरुन्निसा हिचे वय व सौंदर्यही वाढत होते. मेहरुन्निसा ही राजपुत्र सलीमच्या नजरेस पडली. तो तिच्या सौंदर्यावर मोहित झाला होता; परंतु अकबरास सलीम-मेहरुन्निसा यांचा विवाह पसंत नव्हता. मेहरुन्निसाचा विवाह अलीकुली बेग नावाच्या एका इराणी सरदाराशी लावून दिला. हाच अलीकुली बेग म्हणजे शेर अफगाण होय. शेर अफगाण ही पदवी होती व सलीमच्या सेवेत असताना अलीकुली बेग याने एका घावात वाघाला ठार केल्यामुळे ही पदवी सलीमने त्यास दिली होती. पुढे सलीम जेव्हा जहांगीर या नावाने सम्राट झाला तेव्हा त्याने शेर अफगाणला बंगाल प्रांतातील बरद्वानाची जहागीर देऊन तेथे पाठविले. इ.स. १६०७ मध्ये बंगालचा राज्यपाल कुतुबुद्दीनखानशी झालेल्या संघर्षात शेर अफगाण मारला गेला. त्यानंतर चार वर्षांनी म्हणजे इ.स. १६११ मध्ये नवरोज सणा वेळी जहांगीरने मेहरुन्निसाला पाहिले व दोन महिन्यांनी मे १६११ मध्ये तिच्याबरोबर विवाह केला.

**नूरजहानच्या वर्चस्वाचे परिणाम :** नूरजहानच्या जहांगीरवरील तसेच मोगल दरबारावरील वर्चस्वाचे काही चांगले व वाईट परिणाम झालेले दिसतात. ते संक्षेपाने पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) जहांगीरच्या स्वभावात नूरजहानशी झालेल्या विवाहानंतर काहीसा फरक पडलेला दिसतो. या विवाहापूर्वी जहांगीर अतिशय क्रूर होता. सामान्य गुन्ह्यांसाठी तो कडक शिक्षा करी. पण नूरजहानशी झालेल्या विवाहनंतर मात्र त्याच्या शिक्षा देण्याच्या पद्धतीत सौम्यपणा आलेला दिसतो.

२) नूरजहानशी विवाह झाल्यानंतर जहांगीरचे दारू पिण्याचे प्रमाणही कमी झालेले दिसते. हा नूरजहानच्या जहांगीरवरील प्रभावाचा एक चांगला परिणाम होय.

३) नूरजहानने अनावश्यक खर्चांत काटकसर केल्याने तो पैसा जनकल्याणासाठी उपलब्ध होऊ शकला.

४) नूरजहानने मोगल दरबारास आपल्या कल्पकतेने भव्य व आकर्षक स्वरूप दिले. तिने मोगल दरबाराचे सौंदर्य व प्रतिष्ठा वाढविली.

५) कला, साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रांत नूरजहानचे योगदान मोठे होते. तिने वेशभूषा व सौंदर्य प्रसाधनात काही बदल घडवून आणले. गुलाबापासून सुंगधी तेल बनविण्याची पद्धती तिने शोधून काढली. नूरजहानचे वेशभूषा व सौंदर्य प्रसाधन याबाबत शाही दरबारातील स्त्रिया अनुकरण करू लागल्या.

६) नूरजहानच्याच प्रभावामुळे दानधर्म व निराश्रितांना मदत करण्याचा नवा पायंडा शाही दरबारात निर्माण झाला. स्वत: नूरजहान अंत:करणाने मोठी उदार होती. गोरगरिबांच्या तसेच निराश्रित मुलींच्या विवाहासाठी, अनाथ मुला-मुलींसाठी तिने अत्यंत सहृदयतेने मदत केली होती. तिचा आदर्श मोगल दरबाराने पुढे घेतला.

७) नूरजहानच्याच प्रभावामुळे शिक्षण व निरनिराळ्या कलांना उदार राजाश्रय मिळाला.

८) नूरजहान ही स्त्री असल्यामुळे ती कितीही कर्तबगार असली तरी संपूर्ण राज्यावर कडक नियंत्रण प्रस्थापित करणे तिला अशक्य होते. त्यामुळे साहजिकच राज्यकारभारात सैलपणा आला आणि राज्याची शिस्त नाहीशी झाली.

९) नूरजहानच्या राजवटीत भ्रष्टाचाराचे प्रमाण वाढले होते. केवळ नूरजहानची मर्जी संपादन करण्यासाठी धूर्त लोक तिला उंची नजराणे भेट देऊ लागले व आपला हेतू साध्य करू लागले.

१०) नूरजहानच्या अमर्याद महत्त्वाकांक्षेचा व गैरवाजवी हस्तक्षेपाचा परिणाम म्हणून महाबतखान याने नूरजहानविरुद्ध बंड केले. नूरजहान व जहांगीर या दोघांना पकडून ३ महिने आपल्या ताब्यात घेतले व काही दिवस स्वत: राज्यकारभार केला. त्यामुळे राजकीय अस्थिरता निर्माण होऊन जहांगीरचे राजकीय महत्त्व कमी झाले.

१२) नूरजहानच्या वर्चस्वाचा परिणाम म्हणून राजपुत्र खुर्रम हा तिच्यापासून दुरावला. राजपुत्र खुर्रमऐवजी जहांगीरचा कनिष्ठ मुलगा शाहरियरला तिने तिच्या पहिल्या पतीपासून झालेली मुलगी दिली होती. शाहरियरला मोगल बादशहा बनविण्याचे नूरजहानचे प्रयत्न राजपुत्र खुर्रम यास न आवडल्याने त्यानेही बंड केले.

१३) नूरजहानने स्वत:च्या व आपल्या कुटुंबीयांच्या हाती सत्तेचे केंद्रीकरण केल्यामुळे साम्राज्यातील जुने, अनुभवी व कर्तबगार सम्राट असंतुष्ट झाले. त्यामुळे मोगल साम्राज्य कमकुवत बनविण्याची प्रक्रिया सुरू झाली.

**मुमताज महल :**

नूरजहानची भाची व वजीर आसफखानची मुलगी अर्जुमंद बानू ऊर्फ मुमताज महल हिचा जन्म इ.स. १५९४ मध्ये झाला व इ.स. १६१५ मध्ये तिचा विवाह राजपुत्र खुर्रम (शहाजहान) शी झाला. ती अतिशय सुंदर, मनमिळाऊ व पतीभक्त होती. शहाजहानला एकूण १८ अपत्ये झाली होती. त्यापैकी १४ अपत्ये मुमताज महलला झाली होती. या १४ पैकी ८ मुले व ६ मुली होत्या. त्यापैकी ४ मुले व ३ मुली जिवंत राहिल्या.

दारा, शुजा, मुराद, औरंगजेब - मुले

रोशनआरा, जहानआरा व गौहरआरा बेगम-मुली.

इ.स. १६२९ मध्ये शहाजहान जेव्हा दक्षिणेत बुऱ्हाणपूर येथे खानजहान लोदीचे बंड मोडून काढण्यासाठी येऊन थांबला होता तेव्हा त्याच्यासोबत मुमताज महलही होती. तेथेच शहाजहान दोन वर्षे मुमताज महलबरोबर राहिला. आता मुमताज महलचे १४ वे बाळंतपण होते. या १४ व्या बाळंतपणात मुमताज महलचे निधन झाले; पण मुलगी वाचली. तेथेच तिचे दफन करण्यात आले. पुढे काही दिवसांनी तिचा मृतदेह आग्रा येथे नेऊन त्यावर ताजमहाल बांधला.

मुमताज महल ही कट्टर मुस्लिम होती. हिंदू, ख्रिश्चन व इतर धर्मांचे लोक यांचा ती फार द्वेष करी. याबाबत ती शहाजहानची खरोखरच सहधर्मचारिणी शोभत होती. तिच्यामुळेच शहाजहान बिगर मुस्लिम लोकांचा द्वेष करू लागला आणि त्यांच्याबाबत त्याने कडक धोरण स्वीकारले. **डॉ. ए. एल. श्रीवास्तव म्हणतात,** ''शहाजहानने राज्याभिषेकाप्रसंगी आपली बायको महाराणी मुमताज महल हिला दोन लक्ष अश्रर्फी (सोन्याचे रुपये), सहा लक्ष रु. भेट व वार्षिक १० लक्ष रु. देणगी मंजूर केली होती. यावरून शहाजहानचे मुमताज महलवर प्रचंड प्रेम होते हे स्पष्ट होते. शहाजहानच्या धावपळीच्या काळातही ती सतत शहाजहानबरोबरच असे. **डॉ. ए. एल. श्रीवास्तवच्या मते,** ''नूरजहानवर जहांगीरचे जेवढे प्रेम होते त्यापेक्षा जास्त प्रेम शहाजहानचे अर्जुमंद बानू बेगम (मुमताज महल) वर होते.'' मुमताज महलच्या मृत्यूनंतर दुःखाच्या तीव्रतेने शहाजहानचे केस पांढरे झाले. त्यानंतरची दोन वर्षे त्याने गाणे बजावणे व करमणुकीचे इतर प्रकार आणि भपकेबाज पोशाख सोडून दिला. १६३१ च्या डिंसेबरमध्ये मुमताज महलचा मृतदेह आग्रा येथे आणण्यात आला. आग्रा येथे यमुना नदीच्या काठावर एका रिकाम्या जागी मुमताजच्या मृतदेहाचे दफन करण्यात आले. ही जागा राजा मानसिंग याच्या मालकीची होती व ती याप्रसंगी शहाजहान याने त्याचा नातू जयसिंग याच्याकडून खरेदी केली. याच जागेवर शहाजहानने तिची भव्य कबर बांधली. हीच कबर ताजमहल म्हणून ओळखली जाते.

**शहाजहानच्या मुली**

**रोशनआरा :** औरंगजेब, मुराद, दारा व शुजाची बहीण. विदूषी व लेखिका. औरंगजेबची आवडती. ही दरबारात औरंगजेबच्या हिताचे रक्षण करी. दरबारातील महत्त्वाच्या घटना ती औरंगजेबला कळवीत असे. दिल्लीस इस्लामचे शिक्षण देण्यासाठी केंद्र काढले होते. अंत:पुरातील भानगडीमुळे औरंगजेबनेच तिच्यावर विषप्रयोग केला, असे निकोलस मनुची म्हणतो. ती सुस्वरूप, प्रेमळ, उदार, मोकळ्या मनाची होती.

**जहांआरा :** शहाजहानची आवडती मुलगी. औरंगजेबाने शहाजहानला अटक करून आग्रा येथे ८ वर्षे कैदेत ठेवले तेव्हा तिलाही वडिलांसोबत ठेवले. जहांआरा ही औरंगजेबची मोठी बहीण होती व तिनेच औरंगजेबने जिझिया कर लावू नये असे आग्रहाने सांगितले होते. पण औरंगजेबने तिचे म्हणणे ऐकले नाही.

**औरंगजेबाच्या कन्या**

**झीनत-उ-निस्सा :** औरंगजेब तिची प्रत्येक गोष्ट मानत असे. शिवपुत्र शाहू व तिची आई येसूबाई यांना औरंगजेबाने अटक केली व नजरकैदेत ठेवले. १७ वर्षे तो (शाहू) अटकेतच होता. त्याला इस्मलामची दीक्षा देण्याचा औरंगजेबचा विचार होता; पण त्यापासून जीनतुन्निसानेच औरंगजेबला रोखले. तिनेच शाहू व येसूबाईचे संरक्षण केले.

**जैबुन्निसा :** हिला ग्रंथांविषयी फार प्रेम होते. तिचे स्वत:चे ग्रंथालय होते. ती कवयित्री होती. औरंगजेबाने तिला तुरुंगात टाकले होते.

□□□